**प्रेस नोट ता. १३/०७/२०२३**

# धुम स्टाईलने मोबाईल स्नॅचिंग करणारे आरोपी जेरबंद

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

**पिंपरी चिंचवड-** मोबाईल फोन कानाला लावुन मोबाईलवर संभाषण करीत पायी चालत जाणा-या नागरिकांचे महागडे मोबाईल, दुचाकीवरुन धुम स्टाईलने येवून, मोबाईल हिसकावुन क्षणार्धात पळुन जाणा-या गुन्हेगारांच्या गुन्हेगारी कारवायांना आळा घालणे व गुन्हेगारांचा छडा लावणेबाबत मा. पोलीस आयुक्त सो. यांनी गुन्हे शाखांना आदेशीत केले आहे.

गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार यांनी मोबाईल स्नॅचिंग गुन्हे घडणा-या भागातील सीसीटीव्ही कॅमे-याची सातत्याने तपासणी करुन व गोपनिय बातमीदाराकरवी माहीती मिळवुन कसोशिने शोध घेतला. मोबाईल स्नॅचिंगचे गुन्हे करणारे गुन्हेगार हे निर्जनस्थळावरुन मोबाईल फोनवर संभाषण करीत पायी चालत जातांना नागरिकांचे पाठीमागुन मोटर सायकलवरुन येवून अचानक मोबाईल हिसकावुन धुम स्टाईलने क्षणार्धात गायब होत असल्याने त्यांचे मोटर सायकलचा नंबर व वर्णन मिळुन येत नव्हते. गुन्हे घडणा-या भागात सातत्याने पेट्रोलिंग करुन गोपनिय बातमीदारांना सतर्क करण्यात आले होते.

गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अंमलदार अजित सानप व नामदेव कापसे यांना त्यांचे गोपनिय बातमीदाराकरवी बातमी मिळाली कि, तीन इसम हिरो होंडा कंपनीचे स्प्लेंडर मोटर सायकल नंबर एम एच १४ बीडब्लु ७०५३ यावरुन संभाजीनगर परिसरात मोबाईल विकायचे आहेत असे सांगुन संशयितरित्या फिरत आहेत. बातमीप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ चे पथक संभाजीनगर भागात तात्काळ रवाना करुन संशयित आरोपींचा शोध घेतला व रोटरी क्लब चौक संभाजीनगर या ठिकाणी सापळा लावुन मोटार सायकलवरुन फिरणा-या तीन संशयित इसमांना शिताफीने ताब्यात घेतले. त्यांची नावे १) राज उर्फ नन्या आनंद लष्करे वय १९ वर्षे रा. गोधंळे गल्ली, दत्तनगर - रामनगर पिंपरी २) केशव उर्फ ओम किशोर आलंकार वय १८ वर्षे रा. सचिन टेलर्स जवळ दत्तनगर पिंपरी पुणे व त्यांचा एक विधीसंघर्षीत साथीदार अशी आहेत. आरोपीत यांचेकडे सखोल तपास केला असता त्यांनी चिखली, दीघी व पिंपरी चिंचवड परिसरामध्ये मोटर सायकलवरुन फिरुन नागरिकांचे मोबाईल जबरदस्तीने हिसकावुन चोरी केल्याची कबुली दिली आहे.

**आरोपीत यांचेकडून एकूण ६ ॲन्डाईड मोबाईल व गुन्हयात वापरलेली मोटर सायकल असा एकूण १,३८,०००/- रुपये किंमतीचा मुदेमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

**उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे-**

**१) चिखली पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर ४३५/२०२३ भादवि कलम ३९२, ३४ प्रमाणे**
**२) चिखली पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर ४३७/२०२३ भादवि कलम ३९२, ३४ प्रमाणे**
**३) दीघी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर २९८/२०२३ भादवि कलम ३९२, ३४ मधील**

**याप्रमाणे गुन्हे उघडकीस आले असुन आरोपीत यांचेकडून अधिक गुन्हे उघडकीस येण्याची शक्ता आहे. आरोपीत यांचेकडे सखोल तपास सुरु आहे.**

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. श्री संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्रीमती स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री सतिश माने यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र कदम, पोलीस उप निरीक्षक श्री गणेश माने, गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड